एम.जे.सी. क्र.२४३/२०२४

सविता सातारकर –वि.– शिवाजी निळे व १

नि.क्र. ४३ लगत

**अर्जदारातर्फे सा.क्र.१ चा पुढील सरतपास अर्जदाराचे विधीज्ञ श्री. एन. ए. बोरसे यांचेमार्फत शपथेवर सुरु–**

५. मी माझे पुराव्याचे शपथपत्र अभिलेखावर दाखल केले आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर मी सही केली आहे. ते नि.क्र.४३ वर आहे.

६. आता मला मृतक नारायण पांडुजी निळे यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची मुळप्रत दाखविण्यात आली. त्याला **नि.क्र.४४** देण्यात येते. आता मला मृतक इंदुबाई नारायण पाटील यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची मुळप्रत दाखविण्यात आली. त्याला **नि.क्र.४५** देण्यात येते. आता मला दि. १७.१०.२०२४ रोजी सांजदैनिक लोकोपचार मध्ये प्रकाशीत झालेला जाहीरनामा दाखविण्यात आला. त्याला **नि.क्र.४६** देण्यात येते. जाहिरनामा प्रसिध्द करण्यासाठी भरलेल्या पैशाची पावती दाखविण्यात आली. त्याला **नि.क्र.४७** देण्यात येते.

**सरतपास संपला.**

**उलटतपास गैरअर्जदार क्र. २ चे विधीज्ञ श्री. एस. एम. गचके यांचेमार्फत**

७. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांच्या नावाने असलेल्या मालमत्तेच्या वाटणीसाठी मी याच न्यायालयात दिवाणी दावा दाखल केलेला आहे. यावेळेस साक्षीदाराला शिरसगाव निळेची शेती, शिरसगाव निळेच घर व बुलडाण्याचे घर या मालमत्ता दिवाणी दाव्यामध्ये समाविष्ट आहे का असा प्रश्न विचारला असता अर्जदाराच्या विधीज्ञांनी आक्षेप घेतला की, सदरचा प्रश्न या प्रकरणाशी संबंधीत नसून सदरचा प्रश्न विचारणे योग्य नाही. यावर गैरअर्जदाराच्या विधीज्ञांनी प्रतिवाद केला की, लेअर हेअरशिप सर्टीफिकेट हे मालमत्तेसाटठी वापरला जाणार की नाही हा माझा पुढील प्रश्न असेल त्यामुळे सदरचा प्रश्न विचारणे योग्य होईल. सदरचे प्रकरण लेअर हेअरशिप सर्टीफिकेटसाठी दाखल केलेले असून लिगल हेअरशिप सर्टीफिकेट मालमत्तेसाठी वापरण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदरचा प्रश्न संबंधीत आहे की नाही याबाबतचा निर्णय युक्तीवाद व अंतिम न्यायनिर्णयाच्या वेळेस ठरविता येईल. त्यामुळे अर्जदाराच्या विधीज्ञांचा आक्षेप फेटाळण्यात येतो. साक्षीदार सांगते की, सदर प्रकरणात मी वाटणीची मागणी केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वरील मालमत्तेबाबत मी दिवाणी दाव्यात वाटणी मागितलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, लिगल हेअरशिप सर्टीफिकेट मिळाल्यानंतर सदर सर्टीफिकेट मी मालमत्तेवर नाव लावण्यासाठी वापरणार आहे. साक्षीदार स्वतःहून सांगते की, मला जिथे योग्य वाटेल तिथे मी लिगल हेअरशिप

सर्टीफिकेटचा वापर करेल.

प्रश्न – तुमच्या वडीलांची विमा पॉलीसी आहे का ?

उत्तर – सदर प्रश्नाचा या प्रकरणाशी संबंध नाही.

८. साक्षीदार आता सांगते की, माझ्या वडीलांची विमा पॉलीसी होती.

प्रश्न – वारसाचे प्रमाणपत्र न्यायालयाकडून प्राप्त झाल्यानंतर तुम्ही कोणत्या सरकारी कार्यालयात त्यांचा वापर करणार आहात ?

उत्तर – जेव्हा वेळ येईल तेव्हा बघेल.

प्रश्न – वारसाचे प्रमाणपत्र तुम्ही पटवारी कार्यालयात वापरणार नाही ?

उत्तर – जशी वेळ येईल तसा मी त्याचा वापर करेल.

९. हे म्हणणे खरे आहे की, मी वारस असल्यामुळे वाटणीचा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाटणीच्या दाव्यामध्ये समाविष्ट असलेल्या मालमत्तेसाठी मी वारसाच्या प्रमाणपत्राचा उपयोग करण्याशिवाय इतर कोणत्याही कामासाठी त्याचा वापर करण्याचा मला काम नाही.

प्रश्न – तुमच्या वडीलांच्या मालमत्तेसाठी लिगर हेअरशिप सर्टीफिकेट वापरण्याशिवाय तुम्ही कोणत्या सरकारी कार्यालयात लिगर हेअरशिप सर्टीफिकेटचा वापर करण्याची गरज नाही ?

उत्तर – ते मी ठरवेल.

१०. हे म्हणणे खरे आहे की, मी एकाच कारणासाठी दोन केसेस दाखल केलेल्या आहेत.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्वीकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| **(एन. डी. मेश्राम)** | **(एन. डी. मेश्राम)** |
| दि.न्या.क.स्तर, शेगांव कोर्ट क्र.१ ले, | दि.न्या.क.स्तर,शेगांव कोर्ट क्र.१ ले, |
| दि. ११.११.२०२५ | दि. ११.११.२०२५ |